


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २६६, मंगळवार, ०९ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये



# प्रगतीमंत्र

# एंटरटेनमेंट इंडस्ट्रीतील धडपड !

**गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या देशात एंटरटेनमेंट इंडस्ट्री अर्थात मनोरंजन क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. यातील चित्रपट, नाटक, जाहिरात, मालिका अशा विविध क्षेत्रात अनेक कलाकार आपलं नशीब आजमवण्यासाठी धडपडतात.**

### 'ही' कौशल्य हवी

- कोणताही कलाकार एका रात्रीत यशस्वी होत नाही. क्वचितच एखाद्या छोट्या प्रॉडक्शनमध्ये गेल्यानंतर एखादा स्टार बनतो. परंतु या क्षेत्रात येण्यासाठी ही कौशल्य विकसित केली पाहिजेत.
- वाचन क्षमता वाढवा.
- कोणतेही पात्राच्या प्रेरणा आणि भावना अस्सल आणि मनोरंजक पद्धतीने चित्रित करणे आवश्यक आहे.
- अभिनय तंत्राच्या श्रेणीची समजून घ्या.
- दिलेल्या सूचनांचे पालन करत इतरांसह काम करण्याची क्षमता ठेवा.
- भूमिकेला जिवंत करण्यासाठी पात्राचे व्यक्तिमत्व आणि परिस्थिती यांचे संशोधन करा.
- कलाकाराने एखादे वाद्य कसे वाजवायचे किंवा एखाद्या भागासाठी स्टेज फायटिंग सिक्वेन्स कसे करावे हे शिकले पाहिजे.



चित्रपटासह या क्षेत्राशी निगडित अभिनय, दिग्दर्शन, पटकथा लेखन, सिनेमॅटोग्राफी, संकलन, ध्वनी, संगीत, नृत्य दिग्दर्शन, ग्राफिक्स आदी वेगवेगळ्या विभागांमध्ये करियर करण्याच्या उत्तम संधी उपलब्ध झाल्या आहेत. यात अभिनय क्षेत्रात अनेक कलाकार अभिनेत्री आणि अभिनेता बनण्यासाठी मेहनत घेत असतात. पण ऑडिशनमध्ये अभिनयातील स्वतःच वेगळेपण दाखवत हजारो कलाकारांशी स्पर्धा करत पुढे जावे लागते. या स्पर्धेत नंबर लागला तर स्टार नाही तर एका छोट्या रोलवर समाधान मानावे लागते. त्यामुळे अभिनय हे खूप स्पर्धात्मक क्षेत्र आहे. अनेक नकार पचवत, कमी मानधनात, अवेळी केव्हाही काम करण्याची मानसिकता ठेवावी लागते. तरीही अनेकांना अभिनय क्षेत्रात अभिनेत्री किंवा अभिनेता म्हणूनचं करियर करण्याची इच्छा असते, परंतु योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने बहुतांश जण खूप धडपड करत राहतात. त्यामुळे सुरुवातीला या क्षेत्रात ऑडिशन देण्यापासून ते कॅमेऱ्यासमोर येईपर्यंत कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते, किती मानधन मिळते आणि यातून पुढे करियरच्या काय संभाव्य संधी असतात जाणून घेऊ...

## कामाच्या संधी अन् मानधन...

२६ टक्के अभिनेते स्वःनियोजित आहेत आणि १३ टक्के थिएटर कंपनीसाठी काम करतात. अनेक जण वेगवेगळ्या मोठ्या प्रोजेक्टमध्ये काम करतात. काही छोट्या असाइनमेंटवर काम करतात. पण अभिनेत्याने सतत त्यांची पुढचं काम शोधत राहिलं पाहिजे. कारण एक असाइनमेंट एक दिवस असू शकेल तर दुसरी काही महिने असू शकते. तुम्ही सातत्याने कोणत्या जाहिराती, मालिकांमध्ये दिसत राहिलात तर तुम्हाला मोठी ऑफर मिळण्याची शक्यता जास्त असते. पण केव्हाही काम करण्याची आणि प्रवासाची सवय ठेवा. मानधन घेत असलेल्या कामाव्यतिरिक्त अभिनेत्याने ऑडिशन, नेटवर्किंग आणि कौशल्ये विकसित करण्यासाठी वेळ दिला पाहिजे. अभिनेता किंवा अभिनेत्रीला करियरच्या सुरुवातीच्या टप्प्यात ४१,२५,७०० रुपये मानधन मिळण्याचा अंदाज असतो, तर करियरच्या मध्यावर ४२,०८,२१४ रुपये आणि करियरच्या एक अनुभवी टप्प्यावर तब्बल १,५८,४२,६८८ रुपयांपर्यंत मानधन मिळण्याची शक्यता असते.

## संभाव्य करियरच्या संधी




अनेकांचे अभिनेता किंवा अभिनेत्री बनण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. त्यामुळे रुपेरी पडद्यापासून दूर होत, नामांकित नाटकामध्ये भूमिका साकारण्याचे स्वप्न बाजूला ठेवले तर इतरही करियरच्या संधी शोधल्या पाहिजेत. नवोदित कलाकार कदाचित क्रूझ लाइनवर किंवा थीम पार्कमध्ये, प्रादेशिक जाहिरातींमध्ये किंवा ऐतिहासिक री-एनेक्टर म्हणून काम करू शकतात. जाणून घेऊन करियरच्या संभाव्य संधी...

- व्हॉईस ॲक्टर : जाहिराती, व्हिडिओ गेम्स, ॲनिमेटेड सीरिज किंवा फीचर फिल्म्ससाठी व्हॉइस ॲक्टर म्हणून काम करू शकता.
- दिग्दर्शक : लिहिलेली स्क्रिप्ट पडद्यावर जिवंत करण्याची जबाबदारी दिग्दर्शकाची असते. या क्षेत्रातील योग्य कौशल्य तुमच्याकडे असल्यास त्यात करियरची संधी आहे. कास्टिंग, स्क्रिप्ट सर्व गोष्टी व्यवस्थितरित्या हाताळाव्या लागतात. तसेच बजेटमध्ये सर्व गोष्टी बसवाव्या लागतात.
- निर्माता : निर्माता कोणताही चित्रपट, टेलिव्हिजन शो, जाहिराती आणि स्टेज प्रॉडक्शनमधील सर्जनशील प्रक्रियेचे व्यवस्थापन आणि देखरेख करतात. अनेकदा निर्माते नेटवर्क किंवा प्रोडक्शन कंपनीसाठी काम करतात, परंतु बरेच जण फ्रीलान्स किंवा कॉन्ट्रॅक्ट बेसवरही काम करतात. निर्मात्यावर बजेट सेट करण्यापासून ते क्रू मेंबर्स सांभाळण्याची जबाबदारी असते.
- एस्क्ट्रा : केवळ फिल्म, मालिकांमध्येच नाही तर जाहिरात, रिॲलिटी शो आणि काही मोठ्या शोमध्ये गेस्ट म्हणूनही कामाच्या संधी असतात. यातूनही वेगळी इन्कम मिळवता येते.

## कोणत्या गोष्टींची गरज ?

या क्षेत्रात इतर क्षेत्राप्रमाणे शिक्षणाची कोणतीही अट नाही, मात्र तुम्हाला या क्षेत्रात योग्य पद्धतीने करियर करायचेच असेल तर मात्र शिक्षण आवश्यक आहे. अनेक लहान मोठ्या ॲक्टिंग अकॅडमीमध्ये जाऊन अभिनयाचे शिक्षण घेऊ शकता, तर महाविद्यालयीत जीवनात थिएटर, एकांकिका करत या क्षेत्रात पाऊल ठेवता येते. मात्र तुम्हाला अभिनयाची तितकी आवड पाहिजे. मात्र एक अभिनेत्री, अभिनेता होण्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळविण्यासाठी कोणती पाऊलं टाकली पाहिजेत, हे जाणून घ्या...

- अभिनयाचे क्लासेस लावा, महाविद्यालयातील ड्रामा क्लबमध्ये सहभागी व्हा. छोट्या-मोठ्या नाटकांमध्ये सहभाग घ्या.
- बॅचलर पदवी मिळवा, एक चांगला अभिनेत्री, अभिनेता होण्यासाठी शिक्षणाची गरज नसते. पण यात जर औपचारिक शिक्षण घ्यायचे असल्यास बॅचरल डिग्री असावी लागते.
- ऑडिशन आणि कौशल्ये विकसित करा, सिलेक्शन होणार नाही असे वाटत असले तरी वेगवेगळ्या सिनेमा, नाटक, जाहिरांसाठी ऑडिशन देत रहा. यामुळे तुम्हाला एक आत्मविश्वास येईल, अनुभव मिळेल, ओळखी वाढतील.
- मास्टर्स प्रोग्रामचा विचार करा, कधी मोठ्या शो किंवा प्रोग्राममध्ये छोटा रोल करण्याची संधी मिळाली तर ती सोडू नका. याच शोमधून कधी नशीब उजळेल सांगता येत नाही.
- एक चांगला एजंट शोधा, या क्षेत्रात काम करण्यासाठी एजंटची गरजचं असते असे नाही. पण एजंटमुळे अनेक व्यावसायिक संधी मिळतात किंवा माहित नसलेल्या गोष्टी त्यांच्याकडून चांगल्याप्रकारे समजून घेता येतात.

# कल अन् क्षमता ओळखूनच 'कम्प्युटर' क्षेत्रात ठेवा पाऊल!

**कम्प्युटर क्षेत्रांत विविध संधी उपलब्ध आहेत. विविध क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या प्रणाली विकसित करणे, त्याचे व्यवस्थापन करणे यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज आहे. दिवसेंदिवस ती वाढणार आहे हे निश्चित. मात्र, या क्षेत्रात येताना विद्यार्थ्यांनी आपली आवड, कल आणि कुवत ओळखून अभ्यासक्रम निवडणे गरजेचे आहे.**



## दहावीनंतर कम्प्युटर क्षेत्रांतील करिअरचे पर्याय...

सध्याच्या कम्प्युटर, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात सर्वांना कम्प्युटरचे ज्ञान आवश्यक आहे. अनेक पालकांना आपले पाल्य मोबाइल किंवा कम्प्युटर उत्तम हाताळतो, त्यातील गेम्स, ॲप्लिकेशन्स त्यांना येतात म्हणजे मुलाचा कल कम्प्युटरकडे आहे, असा समज करून घेतात. मात्र, खरे म्हणजे कम्प्युटर आणि त्यातील विविध प्रणाली वापरणे किंवा हाताळणे याचा अर्थ कम्प्युटर क्षेत्रांत उत्तम करिअर करता येईल, असा होत नाही. कम्प्युटर, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात कम्प्युटर वापरण्याचे व हाताळण्याचे ज्ञान सर्वांनी घेणे हे क्रमप्राप्त झाले आहे. हे ज्ञान मिळविण्यासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमकेसीएल) माध्यमातून एमएस सीआयटी हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम केल्यानंतर ॲडव्हान्स डिप्लोमाचे पर्याय खुला आहे. महाराष्ट्र सरकारने या अभ्यासक्रमांना मान्यता दिली असून, सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना तसेच नव्याने सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सक्तीचे केले आहे. एमएस सीआयटी अभ्यासक्रम केल्यास कम्प्युटरचे बेसिक ज्ञान, ऑपरेटिंग सिस्टीम, मायक्रोसॉफ्ट ऑफिसमधील एमएस वर्ड, एम एस एक्सेल, एमएस पॉवर पॉइंट आदी प्रणालींचा अभ्यास होतो. सर्चिंग, ब्राउझिंग, ई-मेल करणे यासाठी इंटरनेट कसे वापरावे, इंटरनेट कसे हाताळावे हे समजते. दहावीच्या सुट्टीत हा अभ्यासक्रम करणे सोयीचे ठरते. सरकारमान्य कम्प्युटर प्रशिक्षण केंद्रांत या अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइन घेण्यात येते. त्यानंतर परीक्षा पूर्ण केल्यावर सर्टिफिकेट मिळते. सरकारी आणि खासगी क्षेत्रांत नोकरी करताना हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाते.

### बारावीनंतरच्या संधी

- विज्ञान शाखेतून बारावी केल्यास विद्यार्थ्यांना बीई कम्प्युटर इंजिनीअरिंग, बीई इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, बीएस्सी कम्प्युटर सायन्स, बीएस्सी ॲनिमेशन, बीसीए सायन्स असे पर्याय उपलब्ध आहेत.
- प्रवेशासाठी महत्त्वाचे - कम्प्युटर सायन्स आणि गणित या विषयांचा जवळचा संबंध आहे. पाल्याची ॲनालॅटिकल ॲबिलिटी, लॉजिकल रिझनिंग यातील गती लक्षात घेऊन अभ्यासक्रम निवडावा.
- बीएस्सी ॲनिमेशन : यामध्ये विद्यार्थ्यांना जाहिरात, मोबाइल गेम्स, ॲप्स ई-लर्निंग या क्षेत्रांत संधी आहेत.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
- इंजिनीअरिंगचे शुल्क महाविद्यालयानुसार ठरते. हे शुल्क सरकारची शुल्क निर्धारण समिती ठरवते.

- डिप्लोमा इन कम्प्युटर इंजिनीअरिंग किंवा डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी
- कालावधी : तीन वर्षे.
- प्रवेश प्रक्रिया : डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशनतर्फे (डीटीई) केंद्रीय पद्धतीद्वारे.
- प्रवेशासाठी महत्त्वाचे : दहावीत ७० टक्के किंवा अधिक गुण असल्यास चांगल्या कॉलेजात प्रवेश मिळू शकतो. डिप्लोमा झाल्यावर बीई अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. मात्र, ही प्रवेशसंख्या बीईच्या प्रथम वर्षाच्या निकालावरून ठरते. त्यामुळे काही वेळेला डिप्लोमाला चांगले मार्क मिळूनही पसंतीचे किंवा आवडीचे कॉलेज मिळेलच असे नाही. अशा वेळी काही विद्यार्थी पुन्हा प्रथम वर्ष बीईला प्रवेश घेतात. त्यात एक वर्षाचा कालावधी वाया जातो. डिप्लोमा केल्यानंतर बीएस्सी कम्प्युटर, बीसीए हा पर्यायही उपलब्ध आहे.

### कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी कम्प्युटरमधील करिअर

- बीबीए (कम्प्युटर ॲप्लिकेशन) : कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना कम्प्युटरमध्ये करिअर करण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे.
- एमसीए अभ्यासक्रम तीन वर्षांचा आहे.

### उच्चशिक्षण

बीई कम्प्युटर किंवा आयटी केल्यानंतर एमई, एमएस, एमएस्सी कम्प्युटर हे पर्याय आहेत. शिवाय एमबीए (सिस्टीम्स) करता येते. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा आहे. सर्व अभ्यासक्रमांमध्ये पदव्युत्तर शिक्षण उपलब्ध आहेत. संशोधनात रस असणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. करून संशोधनक्षेत्रात जाण्याचा पर्यायही खुला आहे.



# शिक्षण आणि नोकरी एकत्र करताना...

**नोकरी सोबतच तुम्ही कोणत्याही स्पर्धा परीक्षेची किंवा इतर कोणत्याही परीक्षेची तयारी करत असाल तर त्याची तयारी नीट आणि पूर्ण मेहनत घेऊन करावी लागते. पण नोकरीसोबतच अभ्यास सांभाळणे तुमच्यासाठी खूप अवघड होऊन बसते. या लेखात तुम्हाला अशाच काही टिप्स दिल्या आहेत. जेणेकरून नोकरीसोबतच तुम्हाला अभ्यासही सहज करता येईल.**

अनेक विद्यार्थी स्वावलंबी जीवन जगण्यासाठी अभ्यासासोबत नोकरी देखील करतात. काहींना आर्थिक परिस्थितीमुळे नोकरी करणे अनिवार्य असते, तर काहीजण नोकरीसोबत स्पर्धा परीक्षांची तयारी देखील करित असतात. अशा विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी काही टिप्स फॉलो करणे आवश्यक असते.



### मन सकारात्मक ठेवा

अभ्यास करताना तुमचे संपूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले पाहिजे. असे केल्याने तुमच्या मनात आत्मविश्वासही टिकून राहतो. यासोबतच तुमच्या मनात फक्त सकारात्मक विचार ठेवा. जर तुम्ही जास्त नकारात्मक विचार केलात तर तुमच्या अभ्यासाचाही त्यामुळे खूप त्रास होतो. यासाठी सकारात्मक विचारांनीच अभ्यास करावा.

### ऑनलाइन कोचिंग

कामानंतर संध्याकाळी तुम्ही ऑनलाइन कोचिंग करू शकता. याच्या मदतीने तुमच्याकडे नोट्सही असतील आणि तुम्ही ठरलेल्या वेळेत अभ्यास करू शकाल. याशिवाय वरिष्ठांच्या मदतीने तुम्ही तुमचा अभ्यासही करू शकता. तुम्ही तुमच्या वरिष्ठांकडून मार्गदर्शन देखील घेऊ शकता जेणेकरून तुम्हाला अभ्यास करणे सोपे जाईल.

### वेळापत्रक तयार करा

लहानपणी जसे तुम्ही शाळेचे टाइम टेबल बनवले असेल त्याचप्रमाणे तुम्ही तुमचा आताचा वेळ विभागला पाहिजे. तरच तुम्ही तुमच्या अभ्यासाला वेळ देऊ शकता. यासाठी दिवसभरातील काही तास अभ्यासासाठी काढावे लागतील. असे केल्याने दिवसभरात तुमचा किती वेळ शिल्लक आहे, ज्याचा तुम्ही अभ्यासासाठी उपयोग करू शकता, हे तुमच्या लक्षात येईल. तसेच या वेळापत्रकात तुम्ही कठीण विषयांसाठी वेळ बाजूला ठेवू शकता.

### परीक्षेचा पॅटर्न समजून घ्या

तुम्ही कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेचा अभ्यास करत असाल तर त्यासाठी परीक्षेची तयारी करण्यापूर्वी तुम्हाला त्याची परीक्षा पद्धत समजून घ्यावी लागेल. तसेच, नोकरीसोबत काही तास काढून सुमारे चार ते पाच तास मन लावून तयारी करावी लागेल. जर तुम्ही एखाद्या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी अभ्यास करत असाल तर त्यासाठीही तुम्ही वेळापत्रक बनवा आणि अभ्यासाला सुरुवात करा.



# पारनेर दर्शन

वर्ष १ अंक २६५, मंगळवार ९ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# कलेक्टर ? छे, छे ! थेट पालकमंत्रीच खा. लंके यांच्या भेटीला!

■ राधाकृष्ण विखे यांच्या आश्वासनानंतर खा. लंके यांचे आंदोलन स्थगित ■ जयंत पाटील, राजेंद्र फाळके यांची मध्यस्थी फळाला ■ मागण्यांचा सकारात्मक विचार न झाल्यास पुन्हा आंदोलन





■ पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिलेल्या आश्वासनानंतर खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले आंदोलन मागे घेण्यात आले. ■ खा. नीलेश लंके यांच्या भेटीस आलेल्या जयंत पाटील यांनी शेतकऱ्यांनी आणलेल्या जेवणाचा आवडीने आस्वाद घेतला. ■ पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी चर्चेनंतर खा. नीलेश लंके यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधत आपण हे आंदोलन काही काळासाठी स्थगित करत असल्याचे सांगितले.

नगर : विशेष प्रतिनिधी

**कांदा व दुधाच्या भावासंदर्भात खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाविकास आघाडीच्या वतीने सुरू करण्यात आलेले शेतकरी आक्रोश आंदोलन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी रविवारी रात्री उशिरा आश्वासनानंतर तात्पुरते स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा खा. नीलेश लंके यांनी केली. शेतकऱ्यांच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांनी स्विकारावे अशी भूमिका खा. लंके यांनी घेतली होती, मात्र जिल्हाधिकारी नव्हे तर थेट जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी खा. लंके यांच्यासह आंदोकांची भेट घेऊन मागण्यांचा सकारात्मक विचार करण्याची ग्वाही दिली.**

शेतकऱ्यांच्या दुध व कांद्याच्या दराबाबत खा. नीलेश लंके यांनी आंदोलन घोषीत केल्यानंतर जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी जिल्हयात जमावबंदीचा आदेश जारी केला आणि आंदोलनाच्या पुर्वसंध्येलाच ठिणगी पडली होती. शुक्रवारी आंदोलन सुरू झाले व त्यानंतर बहुतांश वक्त्यांच्या टीकेचे धनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ हेच ठरले. रविवारी दुपारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी अकोले तालुक्यातील गणारे येथे याचा प्रश्नावर दोघा शेतकऱ्यांनी सुरू केलेले आमरण उपोषण मंत्री विखे यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देऊन मागे घेण्यास भाग पाडले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना मंत्री विखे यांनी खा. नीलेश लंके यांना भेटण्याची आपली तयारी असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर या खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनातून मार्ग निघण्याची आशा निर्माण झाली होती. रविवारी रात्री राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे आंदोलकर्त्यांच्या भेटीसाठी आले होते. पाटील व जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी मंत्री विखे यांच्याशी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात चर्चा केली. त्यानंतर मंत्री विखे यांनी आंदोलनस्थळी येत खा. नीलेश लंके यांच्याशी चर्चा केली.

## लंके यांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार

शेतकऱ्यांसाठी आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. जिल्हयाचे खासदार म्हणून नीलेश लंके हे शेतकऱ्यांसाठी आंदोलन करीत आहेत. त्यात काही चुकीचे नाही. याला राजकीय वळण देण्याची माझी भूमिका नाही. शेतकऱ्यांसाठी जे कोणी आंदोलन करत असतील त्यांच्या मागण्यांचा सरकार निश्चित विचार करेल. खा. लंके यांनी मांडलेल्या मागण्या रास्त असून या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

राधाकृष्ण विखे
महसूल, दुग्धविकास तथा पालकमंत्री

## आश्वासनानंतर तात्पुरते आंदोलन स्थगित

कांद्याची निर्यात बंदी उठविल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले मात्र कायमची निर्यातबंदी उठवा अशी आमची मागणी आहे. त्यावर राज्य सरकारच्या माध्यमातून हा प्रश्न केंद्र शासनाकडे मांडण्याची ग्वाही विखे यांनी दिली. महाराष्ट्रातील सर्व ४८ खासदारांना एकत्र करून कांद्याच्या निर्यातबंदीवर काही कायमस्वरूपी तोडगा काढता येईल का यासाठी आपण पुढाकार घेणार आहोत. दुध दरवाढीबाबत उत्पादन खर्चावर दुधाचे भाव ठरविले जावेत ही आमची मागणी आहे. त्यावर कायदा करण्यात येईल अशी ग्वाही मंत्री विखे यांनी दिली असून त्यासाठी त्यांनी अवधी मागितला आहे. दुधाला अनुदान न देता दुधाला ४० रूपये दर देण्याची मागणी आम्ही केली. सध्या अधिवेशन सुरू असून त्यात शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्याची ग्वाही विखे यांनी दिली. विखे यांनी घेतलेल्या मुदतीपर्यंत आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या हाती प्रत्यक्ष काही पडल्याशिवाय आमचे समाधान होणार नाही.

खासदार नीलेश लंके

## शेतकऱ्यांच्या डब्यात पाटील यांचे जेवण

लंके यांच्या आंदोलनास भेट देण्यासाठी जयंत पाटील हे दुपारीच येणार होते. मात्र खराब हवामानामुळे चॉपरचे उड्डाण होऊ शकले नाही. त्यामुळे पाटील हे कारने उशिरा नगरमध्ये पोहचले. मंत्री विखे पाटील यांनी मध्यस्थी करून आंदोलन मागे घेण्यात आल्यानंतर पाटील यांनी तिथेच शेतकऱ्याच्या भोजनाचा अस्वाद घेतला. चटणी आणि लोणचे त्यांना चांगलेच भावले.

## पाटील यांच्यासारखे नेते फार कमी

जयंत पाटील यांच्यासारखे नेते फार कमी पहावयास मिळतात. चॉपरची अडचण होऊनही दुपारी चार वाजता कारने मुंबईतून निघून ते नगरमध्ये पोहचले. कार्यकर्त्यांची काळजी कशी घ्यावी याचे उत्तम उदाहरण म्हणजे जयंत पाटील हे आहेत. कोरोना संकटातही भाळवणीच्या शरदचंद्र पवार आरोग्य मंदिरास त्यांनी भेट दिली. रूग्णांमध्ये येउन त्यांची विचारपूस करणारे जयंत पाटील हे एकमेव नेते आहेत.

खा. नीलेश लंके

## ७० टक्के दुध खाजगी दुध संकलन केंद्राकडे

दुधाच्या बाबतीत असा कोणताही कायदा नाही. पूर्वी खाजगी दुध संकलन करताना परवान्याची अट होती. काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारने हे बंधन काढून टाकले. आज राज्यातील ७० टक्के दुध खाजगी दुध संकलन केंद्रांमध्ये संकलीत होते. अमूल, मदर डेअरीचाही त्यात समावेश आहे. सहकारी दुध संघांकडे २५ ते ३० टक्के दुध असल्याचे विखे यांनी सांगितले.

## जी लंके यांची भूमिका तीच सरकारचीही

शासन कोणतेही असो शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण नेहमीच प्राधान्य देत आलेलो आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही पक्षांमध्ये वेगळी भूमिका नाही. कांदा निर्यात बंदीबाबत केंद्र सरकार निर्णय घेते. त्यामुळे भाव कोसळून त्यातून काही वेगळे प्रश्न निर्माण होतात. आज कांद्यावरील निर्यात बंदी उठलेली आहे. १२ ते १५ रूपये असलेले दर आता ३२ ते ३४ रूपये दरापर्यंत पोहचले आहेत. कांदा निर्यातबंदीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवष्यकता आहे. कांदा निर्यातीवर बंदी घालणे उचित नाही. त्यासंदर्भात राज्य सरकारच्या वतीने मुख्यमंत्र्यांनी केंद्राला पत्र लिहिले आहे. आपणही देशाचे गृह व सहकार मंत्री अमित शहा यांना भेटून विनंती केली आहे. खा. लंके व आंदोलकांची जी भूमिका आहे तीच शासनाची आहे त्यात मतभिन्नता नाही. कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेताना कांदा उत्पादक राज्यांचा विचार घेणे गरजेचे आहे. कांदा निर्यात बंदी करणे आवष्यक आहे का ? याबाबत विचार होणे गरजेचे आहे. शेतकरी हिताची जपवणूक करणे हे राज्य शासनाचे कर्तव्यच आहे.

राधाकृष्ण विखे, पालकमंत्री


## शेतकऱ्यांच्या डब्यात पाटील यांचे जेवण

लंके यांच्या आंदोलनास भेट देण्यासाठी जयंत पाटील हे दुपारीच येणार होते. मात्र खराब हवामानामुळे चॉपरचे उड्डाण होऊ शकले नाही. त्यामुळे पाटील हे कारने उशिरा नगरमध्ये पोहचले. मंत्री विखे पाटील यांनी मध्यस्थी करून आंदोलन मागे घेण्यात आल्यानंतर पाटील यांनी तिथेच शेतकऱ्याच्या भोजनाचा अस्वाद घेतला. चटणी आणि लोणचे त्यांना चांगलेच भावले.


## एकट्या नगर जिल्हयात ५३ लाख लिटर दुध

महाराष्ट्रात १ कोटी ८० लाख लिटर दुध संकलन होते. त्यापैकी ५३ लाख लिटर दुध हे एकटया नगर जिल्हयाचे आहे. शेतकऱ्याच्या दुधाला भाव मिळावा ही मागणी सातत्याने होत असल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले.

## आज आम्ही ट्रेलर दाखविला

पंढरीच्या वारीमुळे सध्या अडचणी आहेत. मात्र तुम्ही सांगितले तर उद्याही मुंबईला माणसे घेऊन येण्याची माझी तयारी आहे. तुम्ही स्थगित करा म्हणाले तर स्थगितही करतो. मात्र सारखे सारखे थांबून पांचटपणा करण्यात अर्थ नाही. कोणत्याही आंदोलनात रिझल्ट घेतल्याशिवाय मी माघार घेत नाही. या विषयावर आज नाही तर कधीच निर्णय होणार नाही. कसा निर्णय घ्यायचा तो जयंत पाटील यांनी निर्णय घ्यावा. आज ट्रॅक्टर रॅलीचा आम्ही ट्रेलर दाखविला. उद्या आम्ही जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालये बंद करणार होतो. जिल्हयाबाहेर पंढरीला जाणाऱ्या दिंडया गेल्यानंतर जिल्हयात चक्का जाम आंदोलन तर त्यानंतर हजार दोन हजार ट्रॅक्टर घेउन मुंबईला मोर्चा नेण्याचे आपले नियोजन होते असे नीलेश लंके यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट घेण्यापूर्वी जयंत पाटील यांना सांगितले.

## मंत्री विखे सकारात्मक

दुधाच्या दराबाबत इतर धान्यांसाठी असलेल्या एमएसपी प्रमाणे दर देण्यात यावा. कांद्याबाबत केंद्र सरकारने ठोस भुमीका घ्यावी. दुध दराबाबत कायदा करण्यासंदर्भात कायदा करावा अशी सुचनाही मंत्री विखे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. कांद्याच्या भावाबाबत खा. नीलेश लंके यांनी केलेल्या मागणीचा मंत्री विखे यांनी सकारात्मक विचार करण्याची ग्वाही दिली आहे. दुधाच्या प्रश्नासंदर्भात ३० रुपये व ५ रुपये अनुदान देण्याची घोषणा विखे यांनी विधीमंडळात केली आहे. आता थेट खात्यावर अनुदान वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुध उत्पादकांना कायमस्वरूपी न्याय मिळाला पाहिजे त्यासाठी काहीतरी मार्ग निघाला पाहिजे हा खा. लंके यांचा हटट आणि आग्रह आहे. त्यासाठी मंत्री विखे यांनी कालावधी मागितलेला आहे.

जयंत पाटील
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

## तुम्ही योग्य खासदार निवडला

महाराष्ट्रातील काही जिल्हे असे आहेत की ते दुधाला ३५ ते ३६ रूपये दर देतात. या असमानतेविरोधात आणि कांद्याबाबत केंद्र सरकारने घेतलेल्या धोरणाबद्दल नीलेश लंके यांनी खासदार झाल्यानंतर त्यांनी हे पहिले आंदोलन हाती घेतले आहे. खासदार कसा असावा ? ज्यांच्या जीवावर आपण निवडून गेलो, त्यांच्या मुळ प्रश्नाला हात घालून प्रश्न सोडविण्यासाठी हट्ट धरणारा असावा. तुम्ही योग्य खासदार निवडला याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे नीलेश लंके हे आहेत.

जयंत पाटील

## पाटील साहेब तुम्ही फक्त लढ म्हणा !

काही लोक केवळ चार दिवस आंदोलन करतात, पाचव्या दिवशी सामान्य होतात. पाटील साहेब तुम्ही आदेश द्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मी पंजाबप्रमाणेच आंदोलन करतो. पंढरीच्या वारीमुळे सध्या अडचणी आहेत. तुम्हीच सांगा पुढे काय करायचे ? तुमचा आदेश आल्यानंतर, तुम्ही फक्त लढ म्हणा, मी मागे हटणार नाही. तुम्ही म्हणाल की मुंबई ठप्प करून टाक तर मी हजार दोन हजार ट्रॅक्टर घेऊन येतो. लोकही घेऊन येतो, फक्त रस्त्याने जेवणाची व्यवस्था करायला सांगा कोणाला तरी असे सांगत लंके यांनी आपण पुन्हा आंदोलनासाठी तयार असल्याचे ठामपणे सांगितले.

## निष्क्रीय शब्द खोडून काढणार

माझी इच्छा नसतानाही मला लोकसभा निवडणूक लढवावी लागली. मात्र आता मी काम करणार आहे. या मतदारसंघात निष्क्रीयपणा जो शब्द सारखा उच्चारला जात होता तो मी कायमचाच खोडून काढणार आहे.

# शॉर्ट न्यूज

## अशोक कॉलेज ऑफ फार्मसीचा निकाल १०० टक्के

■ **श्रीरामपुर :** माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोक कारखाना संलग्न अशोक कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाचा प्रथम वर्ष डी फार्मसीचा निकाल पहिल्याच वर्षी १०० टक्के लागला असल्याची माहिती प्राचार्य प्रसाद कोते यांनी दिली. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आयोजित परीक्षेत प्रथम क्रमांक सामिया कुरेशी ७५. ९० टक्के, द्वितीय क्रमांक रोहिणी गायकवाड ७१. ६० टक्के तर तृतीय क्रमांक श्रावणी सोनवणे ७१. १० टक्के याप्रमाणे विदयार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

## विजेचा धक्का बसून एकाचा मृत्यू

■ **कामरगाव :** विजेचा धक्का बसून एकाचा मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील कामरगाव शिवारात घडली आहे. धनंजय जगन्नाथ कदम (वय ४४ रा. काष्टी, ता. श्रीगोंदा) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. धनंजय कदम हे कामरगाव शिवारातील भुजबळ यांच्या घरावर लोखंडी अँगलचे काम करत असताना त्यांना विजवाहक तारांचा धक्का लागून ते बेशुध्द झाले. त्यांना उपचारासाठी खासगी रूग्णवाहिकेतून जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## भारतीय स्टेट बँक ग्राहकांच्या पसंतीस उतरली

■ **श्रीगोंदा :** भारतीय स्टेट बँक ग्राहकांच्या पसंतीस उतरली असल्याचे प्रतिपादन प्राचार्य बी टी मखरे यांनी केले. श्रीगोंदा येथील भारतीय स्टेट बँक शाखेच्या वर्धापनदिना निमित्त बँकेचे शाखाधिकारी यदू कांवत यांचा सत्कार करताना बोलत होते. प्राचार्य मखरे यांनी पुढे सांगितले की, आज बँक ग्राहकांना तत्पर सेवा देत आहे. आहे. त्यामुळे ग्रामस्थ या बँकेला पसंती देत असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. नानासाहेब कुरुमकर, बँक कृषीधिकारी नाळे साहेब, बँक कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

## आमदार रोहित पवार यांची मागणी

■ **जामखेड :** कुसडगाव (ता. जामखेड) येथील एसआरपीएफ केंद्रातील कर्मचारी व प्रशिक्षणार्थ्यांच्या निवासस्थानासाठी आणि खर्डा व मिरजगाव पोलिस ठाणे आणि तेथील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. तसेच या दोन्ही पोलिस ठाण्यांसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचीही मागणी केली असून याबाबतचे पत्र उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

## दादागिरीच्या विरोधात उपोषण

■ **शेवगाव :** येथील आसरा नगर पाथर्डी रोड येथे २५ ते ३० वर्षापासून झोपड्या टाकून आदिवासी पारधी समाजाचे विनोद काळे, विकास काळे, राणी काळे आदीसह विविध कुटुंब गट क्र. ७६९ मध्ये घरे बांधून लहान बाळासह वास्तव्य करीत आहे. शेवगाव येथील वनपाल कार्यालयामार्फत आम्ही राहणाऱ्या घरावरती अतिक्रमण कारवाई करून बेघर करण्यात आले या निषेधार्थ वनपाल यांच्यावर कायदेशीर कारवाई करून आम्ही २५ ते ३० वर्षापासून राहत असलेल्या जागेवर राहुन द्यावे. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपोषण करण्यात आले आहे.

## कृष्णावंती नदीवरील वाकी तलाव ओव्हर फ्लो

■ **भंडारदरा :** धरण परिसरात पावसाचा जोर वाढल्याने कृष्णावंती नदीवरील वाकी जलाशय पूर्ण क्षमतेने भरला. या जलाशयातून ओव्हर फ्लोचे पाणी प्रवरा नदीपात्रातून ओसंडून वाहू लागले. यामुळे यापुढील काळात निळवंडे धरण जलदगतीने भरण्यास मदत होईल. काल सकाळी भंडारदऱ्याचा पाणीसाठा २१०० दलघफूटवर पोहचला. तर निळवंडे धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढत होत आहे. प्रवरा व मुळा नदी खोऱ्यांच्या उगमापासून ओढे-नाले दुथडी भरून वाहत आहेत.

# वृत्तपत्र वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी राबविला आगळावेगळा उपक्रम

■ पुतणीच्या वाढदिवसाचे औचित्य ■ सेवानिवृत्त शिक्षक नवनाथ शेंडकर यांचे कौतुक



■ लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात विद्यार्थ्यांना दैनिक वृत्तपत्र वितरित करण्यात आले प्रसंगी विद्यार्थी व शिक्षक

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील लोणीमावळा येथील सेवानिवृत्त शिक्षक नवनाथ शेंडकर यांनी पुतणीच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लोकांना वृत्तपत्र वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी लोणी मावळा येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालयाला वृत्तपत्राची भेट देऊन एक सामाजिक उपक्रम राबवला असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

सध्याच्या मोबाईलच्या जमान्यात वाचनाची सवय मोडते की काय अशी शंका उत्पन्न होत आहे . वृतपत्र , पुस्तक यांचे वाचन करताना फारसे विदयार्थी आढळत नाहीत. मुलांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून ही अतिशय गंभीर बाब आहे. शालेय जीवनापासून जर वाचनाची गोडी लागली तरच भविष्यात ही मुले जागृत राहतील. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तम यश संपादन करून शाळेचा , आपल्या गावाचा व कुटुंबाचा नावलौकिक वाढविणार यात शंका नाही.

### स्वतंत्र दृष्टी निर्माण व्हावी

**सध्याच्या जमान्यात मुले पालक मोबाईल पासून दूर होत नाहीत. रात्रंदिवस मोबाईल पाहताना दिसतात. पालकांना व विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचनाची आवड निर्माण व्हावी. त्यांना प्रसार माध्यमाकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी निर्माण व्हावी असे शाळेचे मुख्याध्यापक यांची राऊत यांनी सांगितले.**

विद्यार्थ्यांना वृत्तपत्रातून नेमक्या गोष्टी समजल्या पाहिजेत, सामाजिक , शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्राच्या अनुषंगाने आपल्या परिसरातील संबंधित असलेल्या कोणकोणत्या विषयावर बातम्याद्वारे प्रकाश टाकला जातो हे विद्यार्थ्यांना कळावे यासाठी पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थिनी पूर्वा विकास शेंडकर इयत्ता सातवी हिच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात लोकप्रिय वर्तमानपत्राचे वितरण करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.जी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला असून विद्यार्थी पालक यांच्याकडून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. वृत्तपत्र वाचन माहिती संकलन करणे , वृत्तपत्र वाचून आपल्या परिसरातील समस्या , शैक्षणिक बाबी , नवे उपक्रम व विद्यार्थ्यांचे उपक्रम अशा विविध बाबींच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत असतात. या बातम्यांचे कात्रण काढायचे वहीत चिटकावयाचे आणि संबंधित बातमीतून कोणत्या प्रकारची माहिती मिळाली किंवा आपल्याला या विषयी काय वाटते ते लिहायचे असे या उपक्रमाचे स्वरूप होते. याबाबतची माहिती विद्यालयाचे उपशिक्षक बाबासाहेब दौंड यांनी विद्यार्थ्यांना दिली.

या उपक्रमाचे पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे ,पत्रकार संघाचे मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर, शिरीष शेलार ,भास्कर कवाद ,राम तांबे ,अविनाश भांबरे ,जयदीप कारखिले, संतोष सोबले, आनंद भुकन,जय हरेल , योगेश खाडे, सागर आतकर ,संदीप गाडे, संजय मोरे ,किरण थोरात, स्वप्निल भालेराव ,योगेश खाडे ,अभिजीत कपाळे ,संदीप इथाटे , सचिन जाधव विकास शेंडकर,रोहन उनवणे आदींनी उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदस्य विकास शेंडकर यांच्या हस्ते व पत्रकार संघाच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक नवनाथ शेंडकर यांचा सत्कार करण्यात आला.

# तन्मय ईधाटे याच्यासह ८७ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

ज्ञानोदय स्टडी क्लासचा उपक्रम

**निघोज : प्रतिनिधी**

**विविध परिक्षांमध्ये उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल ज्ञानोदय स्टडी क्लासेसच्या वतीने तन्मय संदीप ईधाटे याच्यासहीत ८७ विद्यार्थ्यांचा गुणवंत विद्यार्थी म्हणून यथोचीत सत्कार केला आहे.**

**गेली २० वर्षांपासून निघोज आणि परिसरात ज्ञानोदय स्टडी क्लासेस माध्यमातून १ ली ते दहावी पर्यंत अतिशय जाणकार व गुणवंत शिक्षक माध्यमातून विद्या देण्याचे काम करीत असून खणकर सर आणि छाया पठारे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली हे शैक्षणिक संस्कृतीचे काम सुरू आहे .**



सोमवार दि.८ जुलै रोजी येथील ८७ विद्यार्थ्यांनी विविध परिक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व सुवर्ण पदक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य संदीप ईधाटे तसेच शिक्षक व पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे संस्थापक खणकर सर यांनी सांगितले की गेली वीस वर्षांपासून ज्ञानोदय स्टडी क्लासेस माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण दिले असून निघोज व परिसरात ज्ञानोदयचा शैक्षणिक दर्जा सर्वोत्तम आहे. येथील विद्यार्थी राज्यात लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून आज राज्यातील विविध भागांत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत तसेच विविध कंपनीमध्ये नोकरी करीत असून ज्ञानोदयमुळे हा शैक्षणिक बदल झाला आहे. ज्ञानोदय स्टडी क्लासेसचे सर्वत्र कौतुक होत असून खणकर सर व छाया पठारे यांचे अभिनंदन केले आहे.

# भेटी लागे जीवा लागलीसी आस !

सुपा,शहाजापूर येथील दिंड्याचे पंढरपुरकडे प्रस्थान

**सुपा : प्रतिनिधी**

**श्री.संत निळोबाराय पायी वारी दिंडी सोहळा शहाजापुर व श्री समर्थ हरिदासबाबा दिंडी सोहळा या दोन्ही दिंड्यांनी रविवारी सकाळी ग्रामप्रदक्षिणा घालत श्री क्षेत्र पंढरपुरकडे प्रस्थान केले. ठिकठिकाणी वारकऱ्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले जात आहे.**



"भेटी लागी जीवा लागलीसे आस ! पाहे रात्रं दिवस वाट तुझी" !! असे म्हणत माऊली, माऊली असा जय घोष करत संत महात्म्यांच्या दिंड्या बरोबर लाखो वारकरी आज पंढरीच्या दिशेने लाडक्या सावळ्या विठुरायाला व रुखमाईला भेटण्यासाठी निघाले आहेत. ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता वारकरी मोठ्या भक्तीभावाने पंढरीच्या दिशेने निघाले आहेत, जागोजागी या वारकरी भक्ताचे मोठ्या भक्ती भावाने स्वागत होत असते.

शहाजापुर येथील पायी वारी दिंडीला अनेक दशकाची परंपरा आहे. कोरोना काळ वगळता ही दिंडी प्रत्येक वर्षी नियमित जात असते. शहाजापुर सोडल्यानंतर पुढे आठ नऊ मुक्काम करत दिंडी पंढरपूर येथे जाते.

# पहिलीचा अर्णव सोनवणे नॅशनल स्कॉलरशिप परीक्षेत राज्यात प्रथम

नगर येथे गुणगौरव व पारितोषिक सोहळा संपन्न



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तनपुरेवाडी येथील विद्यार्थी अर्णव अंकुश सोनवणे (इयत्ता १ली)याला नॅशनल स्कॉलरशीप परीक्षेत २००पैकी २००मार्क मिळून राज्यात पहिला क्रमांक मिळाला आहे.**

नॅशनल स्कॉलरशिप परीक्षा ही संपूर्ण महाराष्ट्रात घेतली जाते.६ जुलै २०२४ रोजी नॅशनल स्कॉलरशिपचे विभाग प्रमुख नितीन जमदाडे यांनी राज्यात येणाऱ्या पहिल्या १ ते ५ मध्ये आलेले व नगर तालुक्यातुन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा घेतला. या सोहळ्यास नगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून विद्यार्थी आले होते. या विद्यार्थ्यांनी कमालीची कामगिरी करून सुवर्ण अक्षरांनी आपले नाव कोरले आहे.या यशाबद्दल नगर मधील श्रेयश लॉन्स व हॉल, सावेडी येथे नॅशनल स्कॉलरशिप परीक्षा पारितोषिक गुणगौरव सोहळा पार पडला.

या सोहळ्यामध्ये राज्यातील गुणवत्ता यादीत आलेल्या १ते ५ विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.या सोहळ्यासाठी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थिती होते. नगर जिल्ह्यातून ४५०० विद्यार्थी या परीक्षेत सहभागी झाले होते. त्यापैकी ५५० विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत चमकले. १ ते ५ या यादीत १०८ विद्यार्थी झळकले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक राज्यकर आयुक्त दत्तात्रय भेसे हे होते , प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक राज्यकर निरीक्षक अनिता मरकड, राज्यकर निरीक्षक अर्जुन दारकुंडे, नगर तालुका पोलीस उपनिरीक्षक रणजित फुलसिंग मारग, डॉ. राजेश गायकवाड, प्रहार अकॅडमीचे अ.नगर प्राध्यापक मालोजी शिकरे, विभाग प्रमुख नितीन जमदाडे इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थिती होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पालक व शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच अर्णव सोनवणे याला प्राथमिक शाळा, तनपुरेवाडी, निघोज येथील सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

स्कॉलरशिप परीक्षेत मुलांनी चांगले मार्क मिळवून शाळेचे व आईवडिलांचे नांव उज्ज्वल केले आहे. मुले हे देशाचे भविष्य आहे असे अध्यक्ष दत्तात्रय भेसे बोलताना म्हणाले व पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.निघोजमधून व पारनेर तालुक्यातून सर्वत्र अर्णव याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नगरी फॉर नेचर टिमकडून शालेय साहित्याचे वाटप

विद्याधामच्या ३५ विद्यार्थ्यांना मदत

**सुपा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या ३५ विद्यार्थ्यांना नगरी फॉर नेचर टिमच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.**



(छाया : शरद रसाळ)

शाळा सुरु होताना गरीब घरातील विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. याची जाणीव ठेऊन नगरी फॉर नेचर या मित्र मैत्रीणींच्या टिमने विद्याधाम प्रशालेतील ३५ गरीब विद्यार्थ्यांना त्यांना आवश्यक असणारा शालेय गणवेश , वहया , पुस्तके , दप्तर , रंगसाहित्य यांची मदत केली .यामुळे या विद्यार्थ्यांना हे साहित्य हाती मिळताच त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले.

आई वडीलांचे छत्र हरपलेली इयत्ता अकरावी मध्ये शिकत असलेली पायल करंजुले हिचे दोन वर्षाचे शैक्षणिक पालकत्व स्विकारताना सारीका कौठाळे या तिची अकरावीची फी भरणार असून तिला देखील गणवेश व शैक्षणिक साहित्य दिले.

नगरी फॉर नेचर टिमच्या सदस्या विद्या कौठाळे - गुंड ,उद्धवराज टेमकर ,अबोली जोशी -पोतनीस,महेश शिंदे ,प्रिया उबरहंडे ,विशाल पंचरीया ,वैशाली गावडे ,शुभांगी कुलकर्णी , माया सिंग, मंजुषा गाडळकर, सुयोग करंजकर,रमाकांत साठे,अभिजित कांबळे,अमोल आठरे, वैशाली शिर्के, अभिजित दिघे हे मित्र मैत्रीणी आपल्या कुटुंबियासह हजर होते.

मुख्याध्यापक विशाल डोके, धर्मराज गुंड, शिव माचवे, प्रशांत भांड, जयेश पोतनीस, महेश कुलकर्णी, रामचंद्र शिर्के, शैला ज्ञानदेव कौठाळे, चांगदेव कौठाळे, शोभा कौठाळे, लता वाघमारे हे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्या कौठाळे, वैशाली गावडे, प्रिया उबरहंडे, वैशाली शिर्के यांनी मनोगत व्यक्त करताना नगरी फॉर नेचर टिमचे आतापर्यंतचे कार्य सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक विशाल डोके यांनी मानले.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# खा. लंके यांच्या ट्रॅक्टर रॅलीने वेधले नगरकरांचे लक्ष !



- आंदोलनाचा तिसरा दिवस ट्रॅक्टर रॅलीने गाजला
- सोमवारी शासकीय कार्यालये बंद करण्याचा दिला होता इशारा
- रविवारी आंदोलनस्थळी जिल्हाभरातील नेत्यांची हजेरी

दुध, कांदा दरवाढीसंदर्भातील आंदोल–नाकडे लक्ष वेधण्यासाठी रविवारी नगर शहरातून ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली.

नगर : विशेष प्रतिनिधी

**खा. नीलेश लंके रांच्रा नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनाचा रविवारी, तिसऱ्या दिवशी आंदोलनास पाठींबा देण्यासाठी शेतकऱ्यांनी नगर शहरातून काढलेल्या ट्रॅक्टर रॅलीमुळे चक्का जाम होऊन वाहतूकीची कोंडी झाली.दरम्यान रविवारी तोडगा न निघाल्यास सोमवारी जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालयांचे कामकाज बंद पाडण्याचा इशारा खा. नीलेश लंके यांनी दिला होता.**

रविवारी मेहबूब शेख, प्रभावती घोगरे, मा. आ. राहुल जगताप, मा. आ. भानुदास मुरकुटे, घनश्याम शेलार, अरूण कडू, मा. आ. साहेबराव दरेकर, गोविंद म ोकाते यांच्यासह जिल्हा तसेच जिल्ह्याबाहेरील नेतेमंडळींनी आंदोलस्थळी हजेरी लावत पाठींबा दर्शविला.

दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ट्रॅक्टर रॅलीस सुरूवात झाली. जिल्हाधिकारी कार्यालय, सुरभी हॉस्पिटल, डीएसपी चौक, स्टेट बँक चौक, चांदणी चौक, बसस्थानक, हॉटेल राज पॅलेस पासून टिळक रोड, नेप्ती नाका, दिल्ली गेट,अप्पू हत्ती चौक मार्गे ही रॅली पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयात पोहचली. रॅलीदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. खा. नीलेश लंके हे स्वतः ट्रॅक्टर चालवत या रॅलीत सहभागी झाले होते. रॅलीमध्ये महिलांचा सहभागही लक्षणीय होता.

दरम्यान आंदोलनस्थळी बोलताना जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरूण कडू यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यावर जोरदार हल्ला चढवत राधाकृष्ण विखे व दुग्ध खात्याचे विचित्र नाते असल्याचे सांगितले. ज्या ज्यावेळी विखे यांच्याकडे दुग्ध खाते आले त्यावेळी दुध धंद्याचे, दुग्ध उत्पादकांचे वाटोळे झाल्याचा आरोप कडू यांनी केला. दुग्ध व्यवसायाचे वाटोळे करण्यास विखे यांनी श्रीरामपुर व प्रवरा दुध संघापासून सुरूवात केली. विखे यांच्या ताब्यातून प्रवरा दुध संघ काढून घेतल्यानंतर १८ वर्षे संघाचा कारभार उत्कृष्ट चालला. तरीही विखे यांनी संचालक मंडळ बरखास्त करण्याची दोनदा नोटीस बजावली. सत्तेचा वापर करून टँकर नाकारण्याचे कारस्थान करण्यात आले. प्रवरा दुध संघ यांनी मोडकळीस आणला महानंदा डेअरी मातीत घातली असल्याचे सांगत दुध धंद्याची विखे यांना कदर नसल्याचा आरोप कडू यांनी केला.

राष्ट्रवादीचे जिल्हाध्रक्ष राजेंद्र फाळके म्हणाले, पहिल्या दिवशी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी आंदोलकांची भेट घेऊन निवेदन स्विकारले असते तर आम्ही आंदोलन मागे घेतले असते. आज जिल्हाधिकारी आमच्याकडे आले तरी आम्ही आंदोलन मागे घेणार नाही. शेतकर्यांच्या पदरात काहीतरी पडले पाहिजे ही आमची भूमिका आहे.

मा. आ. राहुल जगताप म्हणाले, या प्रश्नासाठी खा. लंके रांनी उपोषणाचा मार्ग अवलंबू नये. झोपी गेलेल्या या सरकारला जागे करण्यासाठी गाजावाजा करावा लागेल गोंधळ घालावा लागेल. कांदा, साखर निर्यातबंदी करून केंद्र व राज्य सरकार शेतकर्यांची आडवणूक करीत असल्याचे जगताप यांनी सांगितले. राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख म्हणाले, मा. खा. सुजर विखे रांनी कोरोना संकटात विमानातून रेमडीसिवर इंजेक्शन दाखविले, मात्र याचे पुढे काय झाले हे माहीती नाही. दुसरीकडे नीलेश लंके यांनी पवार साहेबांच्या नावाने आरोग्य मंदिर सुरू करून हजारो रूग्णांची सेवा केली. विखे कुटूंबाला शेतकर्यांच्या प्रश्नांचे देणे घेणे नाही तर खोटे गुन्हे दाखल करणे, चौकशा लावून विनाकारण त्रास देणे यात यांना रस आहे.




शहरातून काढण्यात आलेल्या ट्रॅक्टर रॅलीमध्ये स्वतः ट्रॅक्टर चालवत खा. नीलेश लंके हे सहभागी झाले होते.



खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी त्यांच्या पत्नी स्वतः ट्रॅक्टर चालवत आंद–ोलन स्थळी दाखल झाल्या.

## तर सरकारला शेतकऱ्याला विश्वासात घ्यावे लागेल

खा. नीलेश लंके यांनी विजयी झाल्यानंतर दिलेल्या शब्दाप्रमाणे शेतकरी प्रश्नावर आंदोलन पुकारले असून शेतकरी त्यांच्या पाठीशी खंबिर उभे आहेत. शेतकऱ्यांचे असेच पाठबळ राहिले तर शेतीचे प्रश्न निश्चित मार्गी लागतील. शेतकऱ्यांची एकजूट पाहून सरकार शेतकऱ्याला विच–ारल्याशिवाय निर्णय घेऊ शकणार नाही असा विश्वास गोविंद मोकाते यांनी व्यक्त केला.

## शेतकरी वर्गाची ससेहोलपट थांबेल

आगामी विधानसभा निवडणूकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार आपल्याला सत्तेवर आणायचे आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण असणारे सरकार सत्तेत आल्यानंतर शेतकरी वर्गाची होणार ससेहोलपट थांबणार असल्याचे गोविंद मोकाते यांनी सांगितले.

## पंजाबच्या रॅलीची आठवण

*शेतकर्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी पंजाबमध्ये ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली होती. रा रॅलीमुळे पंजाबमध्येही वाहतूकीची कोंडी झाली होती. त्याच धर्तीवर नगर शहरात ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. दरम्यान, सकाळपासून नगर शहरात आंदोलस्थळी विविध रस्त्यांवरून रेणारे ट्रॅक्टर पोलीसांना आडविले होते. मात्र आंदोलनस्थळावरून इशारा देण्यात आल्यानंतर हे ट्रॅक्टर आंदोलस्थळाकडे सोडण्यात आले. ही ट्रॅक्टर रॅली ट्रेलर आहे. या प्रश्नी यापेक्षाही तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा लंके समर्थकांनी दिला.*

## राणीताईंच्या हाती ट्रॅक्टरचे स्टेअरींग

*खा. नीलेश लंके यांच्या पत्नी तथा जि .प .च्या माजी सदस्या राणीताई लंके ट्रॅक्टर रॅलीने आंदोलनस्थळी स्वतः राणीताई यांनी ट्रॅक्टरचे स्टेअरींग हाती घेतले होते. ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये त्यांच्या सहकारी महिला घोषणाबाजी करत या रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या.*

## ट्रॅक्टर आडविले

*रविवारी आंदोलनस्थळी ट्रॅक्टर घेऊन येण्याचे आवाहन खा. नीलेश लंके यांनी शनिवारी केले होते. सकाळपासून शहरामध्ये ट्रॅक्टर येऊ लागल्याने वाहतूकीची कोंडी होत होती. त्यामुळे पोलीसांनी नेप्ती नाका तसेच भिंगार येथे ट्रॅक्टर आडविले. त्याची माहीती आंदोलनस्थळी समजल्यानंतर आंदोलकांनी संताप व्यक्त करीत आम्ही आतापर्यंत पोलीस प्रशासनास पुर्ण सहकार्य केले आहे. गालबोट लागेल अशी एकही घटना घडली नाही. उपविभागिय पोलीस अधिकारी संपत भोसले यांनी आडविलेले ट्रॅक्टर सोडावेत असे आवाहन ध्वनीक्षेपकावरून करण्यात आल्यानंतर आडविण्यात आलेले ट्रॅक्टर तातडीने सोडण्याच्या सुचना देण्यात आल्या.*

## महामार्गावर वाहतूकीची कोंडी

*आंदोलनस्थळी पारनेर तालुक्यातून नगर–पुणे व नगर–कल्याण महामार्गावरून ट्रॅक्टर येत होते. दोन्ही महामार्गावर वाहतूकीची कोंडी झाली होती. संथ गतीने वाहतूक पुढे जात असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या इच्छित स्थळी पोहचण्यास उशिर होत होता. मात्र शेतकरी आंदोलनास ट्रॅक्टर चालले असल्याची माहीती मि ळाल्यानंतर अनेक प्रवाशांनी त्यांना शुभेच्छा देत आमचा तुम्हाला पाठींबा असल्याच्या भावना व्यक्त केल्या.*

## प्रवराची जमीन वर्ग करून घेतली

*राधाकृष्ण विखे यांनी प्रवरा दुध संघाची महामार्गालगत असलेली तीस कोटी रूपये किमतीची २४ एकर जमीन परस्पर प्रवरा एज्युकेशन ट्रस्टच्या नावे करून घेतल्याचा आरोप अरूण कडू यांनी केला. ही बाब आजही न्यायप्रविष्ट असल्याचे ते म्हणाले.*

## विखे यांनी वर्तणुक बदलावी

*राधाकृष्ण विखे यांनी त्यांची वर्तणुक बदलली पाहिजे. त्यांच्याकडून सत्तेचा मोठया प्रमाणावर गैरवापर होत असून लोक चिडले तर त्यांना परिणामांना सामोरे जावे लागेल असा इशारा अरूण कडू यांनी दिला.*

## कर्डीले शेतकऱ्यांना विसरले

*दुध उत्पादक असलेल्या शिवाजी कर्डीले यांना नगर तालुक्याने वीस वर्षे आमदार म्हणून विधानसभेत पाठविले. अंगावर खादीचे कपडे आल्यानंतर मात्र ते शेतकऱ्यांना विसरले. विधानसभेत त्यांनी शेतकरी हिताची बाजू घेतली नाही. गुंडांच्या टोळया उभ्या करून त्यांना राजाश्रय दिल्याचा आरोप मोकाते यांनी केला.*

## बाळासाहेब थोरात महसूलमंत्री असते तर !

*देशातील आणि राज्यातील सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देत नाही. शहरी लोकांचीच त्यांना जास्त काळजी आहे. शेतकरी विरोधी असलेले हे सरकार असंवेदनशिल आहे. बाळासाहेब थोरात यांच्यासारखे मोठया मनाचे महसूल मंत्री असते तर त्यांनी शेतकऱ्यांचे निवेदन घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले असते असे सांगत घनश्याम शेलार यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे नाव न घेता त्यांना टोला लगावला.*

## राज्यात मविआचे सरकार येणार

*शेतकऱ्यांच्या प्रश्नावर खा. नीलेश लंके यांनी पुकारलेले आंदोलन कौतुकास्पद आहे. दुध व कांद्याच्या भावासंदर्भात शेतकरी वर्गाकडून गेल्या काही महिन्यांपासून मागणी होत असतानाही केवळ शहरी भागाचे हित जोपासणारे केंद्र व राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. भाजपाच्या नेतृत्वाखाली राज्यातील सरकार आगामी निवडणूकीत पायउतार होणार असून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार बहुमताने सत्तेवर बसणार आहे.*

**– नरेंद्र खेडकर,** *शिवसेना (उबाठा) पक्षाचे बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार*

## शेतकऱ्यांचा भ्रमनिरास

*दहा वर्षापूर्वी नरेंद्र मोदी यांचे भाषण ऐकल्यानंतर शेतकरी वर्गाच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. मात्र गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांचा भ्रमनिरास झाला आहे. काँग्रेस राजवटीमध्ये शेतकऱ्यांना इतक्या हाल अपेष्टा कधीही सहन कराव्या लागल्या नाहीत. भाजपाचे सरकार शेतकरी विरोधी आहे.*

**– गोविंद मोकाते,** *मा. जि.प.सदस्य*

## विधानसभा निवडणूकीला दिशा देणारे आंदोलन

*खा. नीलेश लंके यांच्या या आंदोलनामुळे सरकारवर दबाव वाढला आहे. या आंदोलनाची सरकारला दखल घ्यावीच लागेल. या आंदोलनास पाठींबा देण्यासाठी माझ्या मुलासह सहकारी आंदोलनस्थळी येऊन गेले. मला रहावले नाही म्हणून मी पंढरीची वारी सोडून नगर येथे दाखल झालो आहे. सरकार हे आंदोलन मोडू पाहत असेल तर आम्ही लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे आहोत. हे आंदोलन आम्ही राज्यपातळीवर घेउन जाऊ शकतो खा. लंके यांनी योग्य वेळी हे आंदोलन हाती घेतले असून राज्यातील आगामी विधानसभा निवडणूकीस दिशा देणारे हे आंदोलन आहे.*

**– घनश्याम शेलार,** *नेते, राष्ट्रीय काँग्रेस*

## सालीमठ तुम्ही विखेंचे नव्हे जनतेचे नोकर !

*जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ हे दबावातून या आंदोलनाकडे दूर्लक्ष करत आहेत. जिल्हाधिकार्यांनी हे लक्षात ठेवावे की हे सरकार फक्त तीन महिने आहे. यानंतर म हाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर रेणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांना जनतेच्या करातून पगार दिला जातो विखे यांच्याकडून नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे.*

**– मेहबूब शेख,** *प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार युवक काँग्रेस*

बिनविरोध निवड

# ज्ञानेश्वर लंके संपदा पतसंस्थेचे संचालक

## खासदार नीलेश लंके यांच्याकडून अभिनंदन

शिरूर : प्रतिनिधी

**शिरूर येथील संपदा नागरी पतसंस्थेच्या संचालकपदी निघोज येथील खासदार नीलेश लंके यांचे निष्ठावान सहकारी ज्ञानेश्वर तथा बाळासाहेब दगडू लंके यांची बिनविरोध निवड झाली. लंके यांची संचालक म्हणून निवड झाल्याबद्दल खासदार नीलेश लंके यांनी बाळासाहेब लंके यांचे खास अभिनंदन केले.**

खासदार नीलेश लंके यांचे विश्वासू सहकारी असलेल्या ज्ञानेश्वर लंके यांना कॉलेज जीवनापासून सामाजिक कामांची आवड आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली होती. महाविद्यालयीन शिक्षणानंतर सामाजिक जीवनात काम करताना लंके यांनी अनेक सामाजिक, राजकीय पदांवर काम करून आपली सामाजिक बांधिलकी ते जपत आहेत.

पारनेर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या निघोज ग्रामपंचायतीचे सदस्य, त्यानंतरच्या काळात पारनेर तालुका दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी केलेले



काम उल्लेखनीय राहिले आहे. सहकार क्षेत्रात नावलौकीक असलेल्या शिरूर येथील संपदा नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालकपदावर काम करण्याची संधी मिळाल्याने लंके हे या पदास न्याय देऊन संस्थेच्या नावलौकीकात भर घालण्यासाठी योगदान देतील असा विश्वास निघोज पंचक्रोशीतील नागरीकांकडून व्यक्त करण्यात येत असून या पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

### ज्ञानेश्वर यांचे भविष्य उज्वल

*बाळासाहेब तथा ज्ञानेश्वर लंके हे माझे विश्वासू सहकारी असून सामाजिक प्रश्नांसाठी झटणारा हा कार्यकर्ता आता सहकार क्षेत्रातही आपल्या कामाची चुणूक दाखवेल. ज्ञानेश्वर यांचा भविष्यकाळ उज्वल आहे.*

**– खासदार नीलेश लंके**

### मळगंगा देवस्थानचे विश्वस्त

*राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या निघोज येथील मळगंगा देवस्थानच्या मळगंगा देवस्थान ग्रामीण विकास ट्रस्टमध्ये आपले सर्व सहकारी तसेच ट्रस्टच्या सभासदांच्या सहकार्याने विश्वस्त म्हणून काम करण्याची लंके यांना नुकतीच संधी मिळाली आहे.*

# भाळवणीच्या नागेश्वर दिंडीचे पंढरीकडे प्रस्थान

## भाविकांचा मोठा सहभाग; दिंडीचे २२ वे वर्ष

भाळवणी : प्रतिनिधी



**सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र भाळवणी ते श्रीक्षेत्र पंढरपूर दिंडीचे येथील श्री.नागेश्वर मंदिराच्या प्रांगणातून प्रस्थान झाले असून दिंडीचे हे २२ वे वर्ष आहे.**

वै.ह.भ.प. बबन महाराज पायमोडे व ह.भ.प. ब्रम्हचारी दत्तदिगंबर महाराज शहापूर यांच्या आशिर्वादाने आषाढी एकादशी निमित्त शेकडो भाविकांच्या उपस्थितीत भाळवणी येथून विठ्ठल नामाचा जयघोष करत मोठ्या उत्साहात दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी ह.भ.प. राधाकृष्ण शिंदे म हाराज, बाबासाहेब महाराज दळवी, हिराबाई महाराज जाधव, सरपंच सौ. लिलाबाई रोहोकले, मंजाभाऊ चेमटे, संतोष पारख, अरुण कपाळे, बाबूशेठ रोहोकले, संदीप कपाळे, भानुदास तरटे, सुर्यभान रोहोकले, झुंबर रोहोकले, विश्वनाथ रोहोकले, ज्ञानदेव रोहोकले, ज्ञानदेव कुंडलिक, सदाशिव पळसकर, गंगाधर रोहोकले, नागनाथ रोहोकले, आप्पा भुजबळ, संतोष रोहोकले मेजर, भाऊसाहेब रोहोकले मेजर, गिताराम रोहोकले, सचिन रोहोकले, आदींसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

दिंडीचा मुक्काम दि.७ रोजी जि.प. शाळा वाटेफळ, दि.८ घोगरगाव, दि.९ रोजी बाभुळगाव, दि.१० चापडगाव, दि.११ कमलादेवी मंदिर करमाळा, दि.१२ मार्केट यार्ड जेऊर, दि.१३ जि.प. शाळा कंधार, दि.१४ जि.प. शाळा परिते व दि.१५,१६ पंढरपूर असा राहणार असून मोठ्या संख्येने भाविकांनी दिंडीत सहभागी व्हावे असे आवाहन दिंडी पंच कमिटी तसेच हनुमान प्रासादिक भजनी मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# वारकऱ्यांच्या सेवेत भालेकर कुटूंबीय तल्लीन!

पारनेर : प्रतिनिधी

**ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता विठुरायाची आस लागलेल्या पंढरीच्या वारकऱ्यांच्या सेवेमध्ये शहरातील भालेकर कुटूंबिय तल्लीन झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तथा गौरव उद्योग समुहाचे संचालक अर्जुन भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गौरव भालेकर व शुभम भालेकर यांच्या नियोजनातून पारनेर शहरातून पंढरीकडे जाणा–या वारक–यांना फराळ तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे मोफत वितरण करण्यात येत आहे.**

गेल्या चार वर्षांपासून गौरव उद्योग समुहाच्या वतीने हा उपक्रम हाती घेण्यात आला असून वारकरी बांधवांकडून त्यास उत्तम प्रतिसाद मि ळत आहे. गौरव हॉटेलबाहेरच्या डेरेदार वृक्षाखाली वारकरी विसावल्यानंतर त्यांना फराळ तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांची सुविधा उपलब्ध करून दिले जाते. संपूर्ण भालेकर परिवार वारकऱ्यांची सेवा करण्यात तल्लीन होऊन जातो. आतापर्यंत अडीच हजारांहून अधिक वारकऱ्यांना फराळ तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वितरण करण्यात आले आहे. आषाढी वारीपर्यंत हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे संचालक अर्जुन भालेकर म्हणाले.

## पंढरीकडे निघालेल्या वारकऱ्यांना फराळ आणि पाण्याची व्यवस्था

## गौरव उद्योग समुहाचा चार वर्षापासून उपक्रम



### वारकऱ्यांच्या समाधानात आमचे समाधान

*भागवत सांप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन पंढरीकडे निघालेला वारकरी आमच्या हॉटेलपुढील झाडाखाली विसावल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरील समाधानातच आम चे समाधान सामावले आहे. फराळ करून तृप्त झालेले वारकरी पुढची वाट धरताना जो भाव त्यांच्या चेहऱ्यावर असतो तोच भाव पाहून आमचा हा उपक्रम आम्हाला प्रेरणादायी वाटतो.*

**–गौरव भालेकर, शुभम भालेकर**

### सेवेत पांडूरंगाचे दर्शन

*घरातील सर्व कामे, सुख, दुःख बाजूला ठेउन आषाढी वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांच्या सुख, दुःखात सहभागी होऊन त्यांची सेवा करण्यातच पांडूरंगाचे दर्शन होते. गेल्या चार वर्षापासून हा उपक्रम राबविण्यात येत असून ही सेवा अशीच निरंतर सुरू ठेवण्यात आम्हाला आनंद आहे.*

**– सुरेखा भालेकर,** *मा. उपनगराध्यक्षा तथा नगरसेविका पारनेर नगरपंचायत*

### हे आमचे भाग्य

*सामाजिक कामे, व्यवसायाचा व्याप यामुळे प्रत्यक्ष आषाढी वारीमध्ये सहभागी होता येत नसले तरी पंढरीच्या पांडूरंगाचा जयघोष करीत मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करून वारकऱ्यांचा सहवास लाभतो हे आमचे भाग्य आहे.*

**– अर्जुन भालेकर,** *जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, संचालक, गौरव उद्योग समुह*

# वारकरी संप्रदाय आणि लोकभावनेचे नाते अतूट

## सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादनः वासुंदे येथून पंढरपूरकडे दिंडी सोहळ्याचे प्रस्थान

वासुंदे : प्रतिनिधी

**वारकरी संप्रदाय आणि लोकभावना, श्रद्धा यांचे नाते अतूट आहे. लाखो लोक घरदार सोडून विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेकडो किलोमीटर पायी चालत वारीला जातात. यापैकी अनेकांना विठ्ठल हा केवळ देव न वाटता सखा–बाप अशा विविध रूपांत आपलासा वाटतो. महाराष्ट्रालाला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा लाभली आहे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केले.**



वासुंदे येथील दरवर्षीप्रमाणे गावातील श्री.संत भाऊसाहेब महाराज दिंडी प्रस्थान सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी गुरुदत्त पतसंस्थेचे अध्यक्ष बा.ठ.झावरे, भाऊ सैद,उपसरपंच शंकर बर्वे,सेवा संस्थेचे अध्यक्ष नारायण झावरे,उपाध्यक्ष रा.बा.झावरे, विलास साठे,धोंडीभाऊ मधे,रामदास झावरे, मारुती उगले,संस्था निरीक्षक शरद पाटील, दिलीप पाटोळे,लहानु झावरे,सुभाष बर्वे उपस्थित होते.

दिंडी चालक भास्कर हिंगडे यांनी पायी दिंडी सोहळ्याचे उत्कृष्ट असे नियोजन केले होते. पायी दिंडीसाठी निघालेल्या सर्व वारकऱ्यांना सुजित झावरे यांच्या वतीने ऊन,वारा,पाऊस यापासून संरक्षण व्हावे म्हणून टोप्यांचे वाटप करण्यात आले.

# कुकडीच्या सुधारीत जलनियोजनात पारनेरचा समावेश होणार

कान्हूरपठार : प्रतिनिधी

**कुकडी प्रकल्पातील पारनेर तालुक्याच्या हक्काच्या पाण्याचा सुधारीत जलनियोजनात पारनेर तालुक्याचा समावेश होणार असल्याचा विश्वास भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी व्यक्त केला. उपसा सिंचन योजनेसंदर्भातील ४५ वर्षांच्या लढयाचे हे सर्वात मोठे यश असेल असा दावाही कोरडे यांनी केला.**

कुकडी प्रकल्पामध्ये पारनेर तालुक्याचे हक्काचे असलेले पाणी शिल्लक नसल्याचे भासविले जात असले तरी सुधारीत जलनियोजनात पारनेरचा समावेश होणार असल्याचे कोरडे यांनी सांगितले.

या बैठकीस सुभाष दुधाडे, वसंतराव शिंदे, गोकुळ काकडे, महादू नवले, अब्बासभाई मुजावर, सखाराम ठुबे, साहेबराव वाफारे, बाळासाहेब रेपाळे, अनिल तिकोणे, प्रदीप वाळुंज, निवृत्ती वाळुंज, पोपटराव लोंढे, कुशाहरी भांड, पंढरीनाथ भागवत, संभाजी आमले, विकास झावरे, दौलत फापाळे, प्रकाश ठाणगे, डॉ. सुरेश खणकर, भाउसाहेब जगदाळे, दत्तात्रेय जगदाळे, अर्जुन नवले, कानिफनाथ ठुबे, निवृत्ती चौधरी, सिताराम नरवडे, प्रभू भागवत, गोकुळ वाळुंज, गणेश चौधरी, राजू मोरे, दिलीप पारधी, जगदीश आंबेडकर, रवी पायमोडे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.



**कुकडी प्रकल्पातील पारनेर तालुक्याचे हक्काचे पाणी मिळविण्यासाठी उभारण्यात आलेल्या लढयासंदर्भात कान्हूरपठार येथे बैठक पार पडली.**

यावेळी कोरडे यांनी गेल्या दोन वर्षांपासून या योजनेसंदर्भात त्यांनी केलेल्या पाठपुराव्याचा कागदपत्रांसह आढावा घेतला. कुकडी इरीगेशन सर्कलच्या वतीने करण्यात आलेल्या सामंजस्य कराराचा संदर्भ देत जलसंपदा विभागाकडे खंडेश्वर उपसा सिंचन योजना पारनेरचा समावेश करण्याची मागणी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शिफारसशीसह करण्यात आल्याचे कोरडे यांनील सांगितले. पारनेर तालुक्यातील खंडेश्वर उपसा जलसिंचन योजनेमुळे ४५ गावांतील ३४ हजार ८८० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याचे कोरडे यांनी सांगितले. अहवाल तयार करताना या मागणीचा विचार करावा असा आदेश देण्यात आल्याचे कोरडे यांनी सांगताच टाळयांच्या कडकडात उपस्थितांनी त्यांना दाद दिली. यावेळी वसंत शिंदे, प्रदीप वाळुंज, साहेबराव वाफारे, कानिफनाथ ठुबे, अब्बास मुजावर, दत्तात्रेय ठाणगे, बाळासाहेब रेपाळे, गोकुळ काकडे, भाउसाहेब जगदाळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### कोरडे यांनी नेतृत्व करावे

विश्वनाथ कोरडे यांनी या योजनेसाठी पाठपुरावा करीत गेल्या ४५ वर्षात प्रथमच मोठे यश मिळविले आहे. या योजनेच्या पुर्ततेसाठी त्यांनी नेतृत्व करावे अशी साद विविध वक्तयांनी घातली. या प्रश्नात राजकारण दुर ठेऊन काम करणाऱ्या माणसाच्या मागे उभे राहण्याचे आवाहन करण्यात आले.



# ४२ गावांची बुऱ्हाणनगर पाणी योजना बंद

नगर : प्रतिनिधी

**नगर तालुक्यातील ४२ गावांना पाणी पुरवठा करणारी बुऱ्हाणनगर पाणीपुरवठा योजनेचा पाणीपुरवठा १८ जुनपासून बंद आहे. आषाढी वारीनिमित्त नगर तालुक्यात सुमारे ६० हजार वारकरी मुक्कामाला राहुन पुढे मार्गस्थ होत आहेत, परंतु पाणीअभावी वारकऱ्यांसह ग्रामस्थांचे गैरसोय झाल्याच्या निषेधार्थ शिवसेनेच्या वतीने जिल्हा परिषद प्रवेशद्वारावरच ठिय्या म ांडून आंदोलन करण्यात आले.**

घरी आलेल्या पाहुण्यांना जेवण नाही, तर किमान पिण्यास पाणी देण्याची संस्कृती आहे. साकत, दहीगाव येथे संत निवृत्तीनाथ म हाराजांची दिंडी मुक्कामाला होती. त्यांना पिण्यास पाणी उपलब्ध नसल्याने लोकांची मोठी गैरसोय झाली. पाणी योजना बंद असल्याम ुळे झालेल्या गैरसोयीचा निषेध करत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

यावेळी शिवसेनेचे (ठाकरे) संदेश कार्ले, रामदासभोर, शरद झोडगे, प्रवीण गोरे, अमोल तोडमल, बाबा करंडे, राजू गवळी, विलास लोखंडे, प्रशांत वाळके आदी उपस्थित होते.

जोपर्यंत पाणीपुरवठा सुरू होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली होती. मागणीचे निवेदन जिल्हा परिषद प्रशासनास देण्यात आले.

# गावडे विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

## २६ विद्यार्थी पात्र ; यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक




**टाकळी हाजी येथील बापूसाहेब गावडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले.**

### इयत्ता पाचवीचे गुणवंत विद्यार्थी

*पात्र विद्यार्थी १८, गुणवत्ताधारक विद्यार्थी २ : क्षितीज अर्जुन पांढरकर २५६, कृष्णा तुकाराम घोडे २४२, मार्गदर्शक शिक्षक भारती चाटे, लक्ष्मण सोदक, दौलत सोनवणे.*

### इयत्ता आठवी गुणवंत विद्यार्थी

*पात्र विद्यार्थी ८, गुणवत्ताधारक विद्यार्थी ४ : अमृता अर्जुन साळवे २१०, शिवम वसंत कोल्हे २०४, जय इंद्रभान खामकर १९६, सायली अर्जुन चौधरी १९६. मार्गदर्शक शिक्षक कोंडीभाऊ चौधरी, महेंद्र गायकवाड, संजय वाघमारे, बरकले मॅडम, राहुल गावडे.*

निघोज : प्रतिनिधी

**टाकळी हाजी येथील ग्रामीण विकास शिक्षण मंडळाच्या बापूसाहेब गावडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येऊन कौतुक करण्यात येत आहे.**

सर्व यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक आणि पालकांचे संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब गावडे, संस्थेचे सचिव राजेंद्र गावडे, सह सचिव सुनिता गावडे, प्राचार्य आर बी गावडे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांनी अभिनंदन केले. विद्यालयाच्या वतीने संस्थेच्या सहसचिव सुनितातोई गावडे यांच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचा मानाचा फेटा, शाल–श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे पालक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी सुनितातोई गावडे यांनी जीवनातील स्पर्धा परीक्षेचे महत्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य आर.बी. गावडे यांनी प्रास्ताविक, ज्ञानदेव निचित यांनी सुत्रसंचलन तर संभाजी गावडे यांन आभार मानले.